सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**कृषि विभाग**
**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प**
**३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५**

दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२ ई-मेल : pmu@mahapocra.gov.in

जा क्र. नादेकृसंप्र- १६०२४(१३)/१/२०२६-१६/कृ. अ. दि. ०२/०३/२०२६

**प्रति,**

**१. विभागीय कृषी सह संचालक, छ.संभाजीनगर, लातूर, अमरावती, नागपूर, नाशिक.**
**२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (प्रकल्प टप्पा-२ मधील सर्व जिल्हे)**
**३. प्रकल्प संचालक (आत्मा) (प्रकल्प टप्पा-२ मधील सर्व जिल्हे)**

**विषय- कार्यकाल संपुष्टात आलेल्या ग्रामपंचायतीमधील अर्जमंजूरी प्रक्रियेबाबत ...**

**संदर्भ -** १. कृषि व पदुम विभागाकडील शासन निर्णय क्र. संकिर्ण -२०२०/ प्र क्र ८१/ ३-अे, दि. ९.९.२०२०
२. कृषि व पदुम विभागाकडील शासन निर्णय क्र. कृवपदुम-१९०४६/ ७/ २०२६-MAG-८ A (E-१५३६१२२) दि. ३.२.२०२६
३. महाराष्ट्र शासनाकडील अधिसुचना क्र. ८१ दि. २०.२.२०२६

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम सन १९५९ मधील कलम ४९ नुसार ग्रामपंचायत स्तरावर संदर्भीय शासन निर्णय संदर्भ क्र. १ अन्वये ग्राम कृषि विकास समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ कार्यान्वयनाकरिता सदर ग्राम कृषि विकास समित्या कार्यरत रहाणार असल्याचे निर्देश शासन निर्णय संदर्भ क्र. २ अन्वये प्राप्त आहेत.

सद्यस्थितीत काही ग्राम पंचायतींची मुदत संपुष्टात आलेली आहे. संदर्भीय पत्र. क्र. ३, अधिसूचना ८१ नुसार मुदत संपुष्टात आलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्त करण्याचे अधिकार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले आहेत. त्यानुसार प्रशासकांच्या नेमणूका ग्रामपंचयतीकरिता करण्यात येतील.

तरी, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ करिता निवडलेल्या गावांचे संबंधित ग्रामपंचयतीकरिता प्रशासकाची नेमणूक झाल्यास, संबंधित प्रशासक, ग्राम विकास अधिकारी व सहाय्यक कृषि अधिकारी यांचेमार्फ़त प्रकल्प घटकांचे वैयक्तिक लाभाचे तसेच शेतकरी गटांचे अर्ज मंजूरीची कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
PARIMAL SINGH
Date: 02-03-2026
12:11:06

**(परिमल सिंह)**
**प्रकल्प संचालक**
**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प ,मुंबई**

**प्रत, माहितीसाठी**

१. आयुक्त, कृषि, कृषि आयुक्तालय, म. रा., पुणे

**प्रत- कार्यवाहीस्तव अग्रेषित**

१. उपविभागीय कृषि अधिकारी, (प्रकल्पातील सर्व उपविभाग)
२. तालुका कृषी अधिकारी (प्रकल्प जिल्ह्यातील तालुके)